# येस पे साठी अर्ज
# अटी आणि शर्ती

येस पेच्या अर्जासाठी खाली नमूद केलेल्या अटी आणि शर्तींमध्ये वापरकर्ता म्हणजेच 'युझर' (**'युझर'** ह्या संज्ञेमध्ये तिचा अर्थ किंवा संदर्भ यांच्याशी विपरीत नसेल तर, त्याचे वारस आणि नियुक्त व्यक्ती असा देखील अर्थ होईल आणि त्यांचा समावेश असेल.) आणि येस बँक (**'येस बँक'** ह्या संज्ञेमध्ये तिचा अर्थ किंवा संदर्भ यांच्याशी विपरीत नसेल तर, त्यांचे वारस आणि नियुक्त व्यक्ती असा देखील अर्थ होईल आणि त्यांचा समावेश असेल) यांच्या दरम्यान झालेल्या संपूर्ण आणि विशिष्ट कराराचा समावेश होतो. युझर आणि येस बँक यांचा स्वतंत्रपणे **'पार्टी'** (पक्ष) आणि एकत्रितरित्या **'पार्टीज्'** (पक्ष) असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

जर दोन्ही पक्षांनी पद्धतशीररित्या लिखाणामधील कोणत्याही दुरुस्ती, सुधारणा आणि आशय वगळणे यांची व्यवस्थित पुष्टी करुन त्याला सहमती दिलेली असल्याशिवाय ह्या अटी आणि शर्ती यामधील दुरुस्ती, सुधारणा किंवा आशय वगळणे याबाबतचा कोणताही मौखिक किंवा शाब्दिक करार वैध असणार नाही.

ह्या अटी आणि शर्ती या येस बँकेचे कोणतेही खाते किंवा इतर कोणतीही सुविधा यांच्या इतर अटी आणि शर्ती आणि/किंवा येस बँकेकडून प्रसंगोपात निर्देशित करण्यात येऊ शकणाऱ्या इतर अटी आणि शर्ती यांच्यामध्ये भर घालणाऱ्या असतील आणि आधीच्या अटी आणि शर्तींच्या विरुद्ध अर्थाच्या नसतील

**ए. व्याख्या:** पुढील शब्द आणि वाक्प्रचार यांना संदर्भाशी विपरीत होणार नसेल, तर ह्या दस्तऐवजांमध्ये खाली नमूद केल्यानुसार व्यक्त होणारा विशिष्ट अर्थ असेल.

1. **''अर्ज''** म्हणजे ''येस पे साठी अर्ज'' असा असून तो येस बँकेकडील मोबाईल/फेसबुक ॲप्लिकेशनच्या स्वरुपातील असून त्याच्याशी फेसबुकद्वारे संपर्क साधता येऊ शकेल किंवा तो येस पे मार्फत येस बँकेकडून देण्यात येणारी उत्पादने व सेवा यांचा लाभ घेण्यासाठी आयओएस ॲप स्टोअर किंवा गुगल पे स्टोअर मधून ॲंड्रॉइड मोबाइल ऑपरेटींग सिस्टीम अथवा विण्डोज ॲप स्टोअरसाठी डाऊनलोड करता येऊ शकेल.

2. ''वॅलेट'' याचा अर्थ येस बँकेकडून युझरला देण्यात आलेले प्रीपेड पेमेन्ट इन्स्ट्रुमेन्ट (''पीपीआयएस'') असा होईल.

3. ''पार्टनर वॅलेट्स'' याचा अर्थ येस बँकेच्या अनेक पार्टनर्सकडून युझरला देण्यात आलेले प्रीपेड पेमेन्ट इन्स्ट्रुमेन्ट (''पीपीआयएस'') असा होईल.

4. **''अकाउंट्स''** याचा अर्थ युझरचे येस बँकेकडे असणारे कार्यरत बँक खाते किंवा येस बँकेकडून देण्यात येणाऱ्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी युझर येस बँकेला पुरवित असणारे त्यांचे दुसऱ्या कोणत्याही बँकेतील खाते असा होईल.

5. **''अकाउंट होल्डर''** (खातेधारक) याचा अर्थ नॉन रेसिडेन्ट इंडियन्स, करंट अकाउंट, कॉर्पोरेट अकाउंट होल्डर्स आणि फॉरेन अकाउंट होल्डर्स यांच्या व्यतिरिक्त येस बँक किंवा इतर कोणतीही बँक यांच्याकडे युझरचे असणारे खाते असा होईल.

6. ''**कॉन्फिडेन्शियल इन्फॉर्मेशन**'' (गोपनीय माहिती) ही येस बँकेकडून देण्यात येणाऱ्या सवलतींच्या संदर्भात येस बँकेला समजलेली कोणतीही मौखिक, दृश्य अथवा लिखित स्वरुपाची, सुस्पष्ट अथवा अस्पष्ट अशा कोणत्याही प्रकारची तांत्रिक, व्यावसायिक किंवा वित्तिय स्वरुपाची असू शकणारी 'कॉन्फिडेन्शियल' म्हणून ठरविण्यात आलेली असली अथवा नसली तरी गोपनीय समजली जाऊ शकणारी युझरशी संबंधित असू शकणारी त्यांची वैयक्तिक अथवा व्यावसायिक माहिती असू शकते. ह्या गोपनीय माहितीमध्ये गोपनीयतेच्या जबाबदारीशिवाय ती कळविली जाण्यापूर्वी प्राप्तकर्त्याला अन्य कोणत्याही प्रकारे मिळालेली माहिती किंवा ती कळविली जाण्यापूर्वी अथवा कळविली गेल्यावर सर्वसाधारणत: सहजपणे उपलब्ध असणारी माहिती किंवा अशी माहिती जी दुसऱ्या पक्षाकडून मिळालेले साहित्य किंवा माहिती यांचा वापर न करता स्वतंत्रपणे अशा पक्षाला मिळालेली माहिती समाविष्ट नसेल.

7. ''**फॅसिलिटीज्**'' (सुविधा) याचा अर्थ ह्या ॲप्लिकेशनद्वारे येस बँकेकडून वेळचे वेळी देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सवलती असा असेल.

8. ''एनपीसीआय'' याचा अर्थ भारतामध्ये भक्कम पेमेन्ट ॲण्ड सेटलमेन्ट इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याच्या हेतूने पेमेन्ट ॲण्ड सेटलमेन्ट सिस्टिम्स ॲक्ट, 2007 च्या तरतुदी अंतर्गत निर्माण करण्यात आलेली नॅशनल पेमेन्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया असा असेल.

9. ''**लिमिट्स**'' याचा अर्थ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडून प्रसंगोपात निर्देशित केल्यानुसार कोणत्याही धारकाला देण्यात येणारे भारतीय रुपयांमध्ये मापन करण्यात आलेले अशा प्रकारच्या इन्स्ट्रुमेन्ट्सचे कमाल मूल्य असा होईल.

10. ''**मोबाईल नंबर**'' याचा अर्थ अर्ज नोंदणी करण्याच्या वेळेस युझरकडून नमूद करण्यात आलेला मोबाईल क्रमांक असा असेल.

11. ''**मोबाईल फोन**'' याचा अर्थ येस बँकेच्या सुविधांचा वापर करण्यासाठी वैध सिमकार्ड असणारा युझरच्या मालकीचा किंवा त्याच्याकडून वापरण्यात येणारा स्मार्ट फोन असा असेल.

12. ''**पर्सनल इन्फॉर्मेशन**''(वैयक्तिक माहिती) याचा अर्थ युझरकडून वापरण्यात यावयाच्या किंवा वापरण्यात आलेल्या फॅसिलिटीज्बाबत किंवा त्यांच्या संदर्भात युझरकडून देण्यात आलेली आणि/किंवा येस बँकेने मिळविलेली युझर विषयीची सर्व प्रकारची माहिती असा होईल.

13. ''पीपीआयएस''याचा अर्थ इन्स्ट्रुमेन्ट्सवर जमा झालेल्या मूल्याच्या मोबदल्यात वित्तिय सेवा, रेमिटन्सच्या सेवा यांच्यासह वस्तु आणि सेवा यांची खरेदी करण्याची सुविधा पुरविणारे, प्रसंगोपात दुरुस्त करण्यात आलेल्या मास्टर डायरेक्शन ऑन इन्शुअन्स ॲन्ड ऑपरेशन ऑफ प्रिपेड पेमेन्ट इन्स्ट्रुमेन्ट्स, दिनांकीत 11 ऑक्टोबर 2017 च्या अनुसार देण्यात आलेले पेमेन्ट इन्स्ट्रुमेन्ट असा होईल.

14. ''**ट्रान्झॅक्शन**'' (आर्थिक व्यवहार) याचा अर्थ निधी हस्तांतरण सेवा किंवा मर्चंट वेबसाईटवर विविध उत्पादने आणि सेवा यांचे पैसे देण्यासाठी ॲप्लिकेशनचा वापर अथवा प्रसंगोपात ॲप्लिकेशनद्वारे येस बँकेकडून देण्यात आलेल्या इतर सोयीसुविधा असा होईल.

15. ''**युझर**''याचा अर्थ येस बँकेचा खातेधारक त्याचप्रमाणे इतर कोणतीही (जी येस बँकेची वर्तमान ग्राहक नाही किंवा जिचे येस बँकेबरोबर कोणतेही व्यावसायिक संबंध नाहीत.) अशी व्यक्ती जिने ॲप्लिकेशनसाठी नोंदणी केलेली आहे आणि जी व्यक्ति फॅसिलिटीज्‌चा लाभ घेण्यास पात्र आहे.

16. ''युपीआय''याचा अर्थ भारतामध्ये शक्तिशाली पेमेन्ट ॲण्ड सेटलमेन्ट इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याच्या हेतूने पेमेन्ट ॲण्ड सेटलमेन्ट सिस्टीम्स ॲक्ट, 2007 च्या तरतुदींच्या अंतर्गत भारतामध्ये रिटेल पेमेन्ट्स आणि सेटलमेन्ट प्रणाली राबविण्यासाठी नियंत्रक संस्था असणाऱ्या नॅशनल पेमेन्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून विकसित करण्यात आलेली युनिफाईड पेमेन्ट इंटरफेस ही मोबाइल डिव्हाइस/ॲप्लिकेशन पेमेन्ट सिस्टिम मार्फत तात्काळ रियल-टाइम मनी ट्रान्सफर करणारी प्रणाली असा होईल.

17. ''व्हिपीए'' याचा अर्थ यूपीआयचा भाग म्हणून सादर करण्यात आलेला व्हर्च्युअल पेमेन्ट ॲड्रेस असा होईल.

18. ''व्हर्च्युअल कार्ड''याचा अर्थ सदर ॲप्लिकेशन द्वारे येस बँकेकडून देण्यात आलेले व्हर्च्युअल कार्ड असा होईल.

19. ''क्रेडिट कार्ड ''याचा अर्थ येस बँकेच्या वेबसाईटवर नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्ती यांच्या अधीन, येस बँकेकडून देण्यात आलेली क्रेडिट कार्ड्स असा होईल.

20. ''ट्रॅव्हल कार्ड''याचा अर्थ येस बँकेच्या वेबसाईटवर नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्ती यांच्या अधीन, येस बँकेकडून देण्यात आलेले 'मल्टि करन्सी प्री-पेड इन्स्ट्रुमेन्ट' असा होईल.

21. ''सेव्ह्ड कार्ड''याचा अर्थ येस पे वर युझर कडून साठवून ठेवण्यात आलेली डेबिट/क्रेडिट कार्ड्सची माहिती असा होईल.

22. ''ऑटो-रिफिल'' याचा अर्थ वॅलेट ऑटो-लोडिंग करण्याची सुविधा असा होईल.

**बी. 'पात्रता आणि वापर':**

1. ह्या सुविधा अशा प्रकारच्या युझर्सकडे भारताच्या सरहद्दीमधील टेलिकॉम कंपनीकडे नोंदणी असणारा वैध मोबाईल क्रमांक असणे आणि तो अशा सुविधांचा वापर करण्यासाठी पर्सनलाइझ्ड पासकोड तयार करणे एवढी परंतु तेवढीच मर्यादा नसणाऱ्या आणि आवश्यक ते पुरावे (विश्वास सिद्ध करणारे पुरावे) अधिकृत स्थितीत असणे यांच्या अधीन भारतातील सर्व युझर्ससाठी उपलब्ध असतील.

2. ह्या सर्व फॅसिलिटीज (सुविधा) ह्या येथे नमूद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या युझर्ससाठीच उपलब्ध करुन देण्यात येतील आणि ते संपूर्णत: येस बँकेच्या अधिकारात असेल. हा युझर असे मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की या फॅसिलिटीज युझरला कोणतीही पूर्वसूचना देऊन किंवा न देता कोणत्याही वेळेस येस बँकेकडून खंडीत केल्या जाऊ शकतात.

**सी. ऑथोरायझेशन (अधिकार देणे):**

1. हा युझर अपरिवर्तनीयरित्या आणि विनाशर्त येस बँकेला नाव नोंदणीच्या वेळेस आणि ॲप्लिकेशन ऑथेन्टीकेशन करण्याच्या वेळेस अथवा येस बँकेकडून फॅसिलिटीज्चा लाभ घेण्यासाठी आर्थिक व्यवहार करीत असताना युझरकडून उघड करण्यात आलेली खाती आणि व्यक्तिगत तपशील यांना कोणत्याही वेळेस संपर्क साधण्यासाठी येस बँकेला अधिकार देत आहे.

2. युझर सुस्पष्टपणे, अपरिवर्तनीयरीत्या आणि बिनाशर्त, येस बँकेला कोणतीही (*तोंडी अथवा लेखी*) सूचना न देता किंवा युझरच्या संमतीशिवाय, येस बँकेला आवश्यक असेल त्यानुसार, आपल्या ताब्यातील युझरची सर्व माहिती कोणतेही सेवा पुरवठादार अथवा कोणताही तृतीयपक्ष यांच्याकडे उघड करण्यासाठी अधिकार देत आहे.

3. युझर सुस्पष्टपणे अपरिवर्तनरीत्या आणि विनाशर्त येस बँकेला संपूर्णत: येस बँकेच्या अधिकारात निश्चित करण्यात येणाऱ्या कालावधीपर्यंत आणि त्या वेळेपर्यंत युझरची माहिती आणि आर्थिक व्यवहाराचे तपशील नोंदविण्यासाठी, जवळ ठेवण्यासाठी आणि साठवून ठेवण्यासाठी अधिकार देत आहे.

4. युझर सुस्पष्टपणे, अपरिवर्तनीयरित्या आणि विनाशर्त येस बँक आणि/किंवा त्यांचे एजंट्स/प्रतिनिधी यांना युझरच्या मोबाईल नंबरवर येस बँकेला युझरच्या माहितीसाठी योग्य वाटतील अशा कोणत्याही शुभेच्छा, बॅनर्स किंवा इतर प्रचारात्मक मेसेजेस यांच्यापासून येस बँकेची कोणतीही वर्तमान उत्पादने यांची माहिती अथवा सुरु करण्यात आलेली किंवा सादर करण्यात आलेली कोणतीही उत्पादने यांच्या माहितीसह कोणत्याही प्रचारात्मक ऑफर्सविषयी युझरला कळविण्यासाठी, कोणतेही मेसेज पाठविण्याचा किंवा दूरध्वनी करण्याचा अधिकार देत आहे.

5. युझर सुस्पष्टपणे, अपरिवर्तनीयरित्या आणि विनाशर्त येस बँकेला जर युझरकडून करण्यात आलेली विनंती ही संबंधित फॅसिलिटीज् अंतर्गत येस बँकेकडून निर्देशित केलेल्या आवश्यकतांच्या अनुसार नाही, असे येस बँकेला आपल्या संपूर्ण अधिकारात आढळून आले, तर कोणताही नकार देणारा मेसेज पाठविण्यासाठी किंवा कोणत्याही आर्थिक व्यवहाराची विनंती नाकारण्यासाठी अधिकार देत आहे. येस बँकेकडून घेण्यात आलेले सर्व निर्णय वैध आणि युझरसाठी बंधनकारक असतील.

6. युझर अपरिवर्तनीयरीत्या आणि विनाशर्त येस बँकेकडून देण्यात आलेल्या मंजूर करण्यात आलेल्या कोणत्याही फॅसिलिटीजचा लाभ घेण्यासाठी येस बँक किंवा इतर कोणतीही बँक यांच्याकडे असणाऱ्या त्यांच्या अकाउंट्समध्ये डेबिट (वजावट) करण्यासाठी अधिकार देत आहे.

7. जर युझरने सेव्हड् कार्ड फॅसिलिटी वापरण्याचा पर्याय निवडला तर युझर येस बँकेला कार्डची माहिती सेव्ह/स्टोअर करण्यासाठी विनाशर्त अधिकार देत आहे.

8. जर युझरने ॲप्लिकेशनद्वारे ऑटो–रिफिल फॅसिलिटीची एकदा निवड केली तर युझर सेव्हड कार्डला डेबिट करुन वॅलेट लोड करण्यासाठी येस बँकेला विनाशर्त अधिकार देत आहे.

9. युझर अपरिवर्तनीयरित्या आणि विनाशर्त येस बँकेला एनपीसीआय यांनी सादर केलेल्या लागू होणाऱ्या गाईडलाईन्सच्या अनुसार, यूपीआय रजिस्ट्रेशनचा एक भाग म्हणून युझरच्या मोबाईल नंबरवरुन आऊटवर्ड एसएमएस पाठविण्यासाठी अधिकार देत आहे.

**डी. युझरकडून विनंती आणि हमी:**

1. युझर जाणून आहे, मान्य करीत आहे आणि पुष्टी देत आहे की फेसबुक अकाउंट, मोबाईल फोन, डाटा कलेक्शन इ. चा समावेश असणाऱ्या परंतु तेवढ्याच मर्यादेत नसणाऱ्या, ह्या फॅसिलिटीज अंतर्गत विशिष्ट लाभ मिळविण्यासाठी आणि त्यांचा संपर्क मिळविण्यासाठी पूर्व आवश्यकता असू शकणारी कोणतीही अट ही संपूर्णत: युझरचा निर्णय आणि जबाबदारी असेल.

2. युजर मान्य करीत आहे, पुष्टी देत आहे आणि स्वीकार करीत आहे की युझरकडून वापरण्यात आलेल्या फॅसिलिटीज् अथवा युझरने केलेले आर्थिक व्यवहार याबाबत येस बँकेकडून ठेवलेल्या सर्व नोंदी, आकडेवारी, निर्माण झालेले तसेच सांभाळलेले आणि टिकवून ठेवलेले सर्व तपशील हे आर्थिक व्यवहाराची अस्सलता आणि अचूकता यांचा संपूर्ण पुरावा असतील.

3. युझर मान्य करीत आहे, पुष्टी देत आहे व स्वीकार करीत आहे की येस बँकेकडून निर्माण करण्यात आलेल्या, ठेवण्यात आलेल्या व साठवून ठेवण्यात आलेल्या सर्व नोंदी, आकडेवारी आणि तपशील या गोष्टी कोणताही दावा, विवाद अथवा आक्षेप यांच्याशिवाय वैध, अंतिम आणि युझरसाठी बंधनकारक असतील.

4. युझर अपरिवर्तनीयरीत्या आणि विनाशर्त मंजूर करीत आहे आणि संमती देत आहे की येस बँक आणि/किंवा त्यांचे एजंट/प्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आलेले सर्व कॉल्स अथवा मेसेजेस हे युझरच्या खाजगीपणाचा भंग असल्याचे समजले जाणार नाहीत आणि युझर येस बँक आणि/किंवा त्यांचे एजंट/प्रतिनिधी यांना त्याबाबत उत्तरदायी किंवा जबाबदार धरणार नाही.

5. युझर विशेषत: मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की युझरसाठी आणि/किंवा त्याच्या वतीने ॲप्लिकेशनद्वारे केलेल्या सर्व मागण्या किंवा आर्थिक व्यवहार हे युझरकडून आलेल्या अशा प्रकारच्या मागण्या अथवा आर्थिक व्यवहार यांच्या अधिकृततेची पडताळणी करण्याची येस बँकेवर कोणतीही जबाबदारी न घेता येस बँकेकडून पार पाडण्यात येतील किंवा त्यावर प्रक्रिया करण्यात येईल.

6. येस बँककडे ह्या सुविधांमार्फत प्रसंगोपात कोणत्याही नवीन सेवा सुरु करण्याचा पर्याय असेल आणि अशा प्रकारच्या नवीन सेवांसाठी युझरची नोंदणी करण्यासाठी युझरने येस बँकेला खास करुन अधिकार दिलेले असतील.

7. युझर हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (''आरबीआय'') यांच्याकडून वेळचेवेळी निर्देशित केल्यानुसार निधी हस्तांतरणाचे नियंत्रण करणाऱ्या लागू होणाऱ्या ॲन्टि–मनी लॉण्डरींग (एएमएल) निकषांचे पालन करील.

8. जर युझरला अशी शंका आली की येस बँकेला पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारची चूक किंवा विसंगती आहे तर युझर अशा प्रकारच्या चूक किंवा विसंगती विषयी लेखी स्वरुपात ताबडतोब येस बँकेला माहिती देईल. येस बँक शक्य असेल तेथे सर्वोत्तम प्रयत्न करुन अशी विसंगती किंवा चूक दुरुस्त करण्याचे किंवा सुधारण्याचे प्रयत्न करील.

9. युझर हे मान्य करीत आहे की युझरकडून येस बँकेकडे नोंदणी केलेला मोबाईल फोन अथवा मोबाईल क्रमांक यांच्याद्वारे करण्यात आलेला कोणताही आर्थिक व्यवहार हा केवळ युझरकडूनच करण्यात आलेला असून तो युझरच्या मुक्त इच्छेने, संमतीने आणि संपूर्ण अधिकारात केलेला आहे असे समजण्यात येईल.

10. युझरच्या खात्यामध्ये कोणताही अनधिकृत व्यवहार झाल्याची जाणीव झाल्यास येस बँकेला तसे कळविणे हे युझरचे कर्तव्य असेल.

11. युझर ह्याद्वारे मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की या फॅसिलिटीजचा वापर केल्याने युझरने येथे नमूद केलेल्या सर्व अटी आणि शर्ती मान्य केल्या असल्याचे समजण्यात येईल आणि येस बँकेकडून वेळचे वेळी निर्देशित केलेल्या सर्व प्रकारच्या अटी आणि शर्ती जणू काही युझरने लिखित स्वरुपात मान्य केल्याप्रमाणे युझरवर बंधनकारक राहतील.

12. फॅसिलिटीज् अंतर्गत असणाऱ्या सर्व हेतूंच्या बाबतीत ह्या फॅसिलिटीज्द्वारे देण्यात आलेल्या ॲप्लिकेशनचा अनधिकृत आणि बेकायदेशीर वापर होण्याचे टाळण्यासाठी युझर सर्व प्रकारची आवश्यक खबरदारी घेईल.

13. युझर हा पासकोड/ओटीपी/कोड/पासवर्ड यांच्या गोपनीयतेचे पालन करण्यासाठी त्याचप्रमाणे हे पासकोड/ओटीपी/कोड/ पासवर्ड यांचा वापर अथवा गैरवापर यामुळे निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांसाठी जबाबदार असेल.

14. फॅसिलिटीजचा वापर करताना युझर कोणताही बेकायदेशीर, त्रासदायक, धमकी देणारा, अपमानास्पद, अश्लील, छळवणूक करणारा, बदनामी करणारा, बीभत्स, लैंगिक वर्णन करणारा, अपवित्र, असभ्य, भावना भडकविणारा, अब्रूनुकसानी करणारा, यातना निर्माण करणारा, तिरस्कारपूर्ण तसेच वांशिक, मानववंश विषयक, सामाजिकदृष्ट्या, कायदेशीरदृष्ट्या, नैतिकदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या हरकत घेण्यासारखा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हरकत असू शकणारा मजकूर अपलोड, डाऊनलोड, पोस्ट किंवा इतर कोणत्याही मार्गाने प्रसारीत करणार नाही किंवा प्रतिष्ठित व्यक्तींचे अधिकार किंवा त्यांचे खाजगीपण किंवा बौद्धिक संपत्ती यांचा समावेश असणाऱ्या, परंतु एवढ्याच मर्यादेत नसणाऱ्या अधिकारांसह दुसऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या अधिकारांचे उल्लंघन करणार नाही.

15. युझर मान्य करीत आहे, पुष्टी करीत आहे आणि स्वीकार करीत आहे की येस बँक सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद येस बँकेच्या संपूर्ण अधिकारांमध्ये कोणत्याही प्रकारात अथवा स्वरुपात ठेवू शकेल. कोणत्याही प्रकारचे विवाद निर्माण झाल्यास येस बँकेच्या नोंदी बंधनकारक राहतील आणि त्या सदर ॲप्लिकेशनद्वारे केलेल्या आर्थिक व्यवहारांचा एकंदरीत पुरावा असतील.

16. युझर येस बँकेने अधिकृत केल्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धतीने ॲप्लिकेशनचा वापर किंवा त्याच्याशी संपर्क करणार नाही. जर युझरने इतर कोणत्याही हेतूसाठी ॲप्लिकेशनचा वापर केला आणि हे हेतू बेकायदेशीर, अयोग्य किंवा अटी आणि शर्तींच्या अंतर्गत अधिकार दिलेले नसतील, तर येस बँकेला अशा प्रकारचा अनधिकृत संपर्क टाळण्यासाठी सर्व प्रकारची कारवाई करण्याचा अथवा वाजवी पाऊले उचलण्याचा अधिकार असेल.

17. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की ॲप्लिकेशनला वेळचेवेळी (अधूनमधून) देखभालीची गरज पडू शकते आणि या काळामध्ये युझरच्या आर्थिक व्यवहारांच्या विनंतीवर प्रक्रिया करणे शक्य होणार नाही.

18. येस बँकेकडून युझरला देण्यात येणाऱ्या अथवा दिलेल्या फॅसिलिटीज्च्या वापरासाठी पूर्व अट म्हणून युझर कडून येस बँकेला दिलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत युझर संपूर्ण जबाबदारी घेत आहे.

**इ. युझरचे उत्तरदायित्व:**

1. युझरकडून येस बँकेला पुरविण्यात आलेल्या कोणत्याही अथवा सर्व माहितीच्या नेमकेपणासाठी व अचूकपणासाठी युझर संपूर्णत: उत्तरदायी आणि जबाबदार असेल.

2. युझर हा ॲप्लिकेशनद्वारे अथवा येस बँकेच्या मर्चंट ऑपरेटर्स/सेवा पुरवठादारांपैकी कोणाही मार्फत केलेल्या अपेक्षित किंवा अचूक लाभार्थीला केलेल्या निधी हस्तांतरणासाठी संपूर्णत: उत्तरदायी व जबाबदार असेल.

3. या ॲप्लिकेशनद्वारे देण्यात आलेल्या फॅसिलिटीजचा लाभ घेण्यासाठी युझरकडून येस बँकेला पुरविण्यात आलेल्या माहितीमधील कोणतीही विसंगती अथवा चूक यासाठी युझर संपूर्णत: उत्तरदायी आणि जबाबदार असेल.

4. येस बँककडून देण्यात आलेल्या अथवा देण्यात यावयाच्या फॅसिलिटीजच्या वापरासाठी आवश्यक असणारा आपला मोबाईल फोन, मोबाईल नंबर आणि पासकोड यांचे संरक्षण करण्यासाठी युझर संपूर्णत: उत्तरदायी आणि जबाबदार असेल.

5. पासकोड/पासवर्ड्स किंवा ॲप्लिकेशन यांचा कोणताही अनधिकृत अथवा बेकायदेशीर वापर किंवा येस बँकेला देण्यात आलेल्या कोणत्याही फसवणूक करणाऱ्या अथवा चुकीच्या सूचना यांच्या संदर्भात युझर येस बँकेला संपूर्णत: उत्तरदायी आणि जबाबदार असेल.

6. युझरकडून झालेली कोणतीही कृती अथवा हलगर्जीपणा यांच्यामुळे झालेली कोणतीही अथवा संपूर्ण हानी यासाठी युझर येस बँकेला संपूर्णत: उत्तरदायी आणि जबाबदार असेल आणि त्याला माहित असणाऱ्या अथवा त्याचा सदर बाब खरी आहे असा विश्वास असणाऱ्या ॲप्लिकेशनमध्ये त्याच्या वतीने करण्यात आलेल्या कोणत्याही अनाधिकृत वापर/संपर्क किंवा ओटीपी/पासकोड/पासवर्ड यांचा गैरवापर अथवा फॅसिलिटीजशी संबंधित इतर कोणताही सुरक्षिततेचा भंग याविषयी येस बँकेला ताबडतोब कळविण्याचे युझर मान्य करीत आहे.

7. युझरच्या मोबाइल नंबरमध्ये कोणताही बदल झाला किंवा युझरचा मोबाईल फोन गहाळ झाला किंवा युझरचा मोबाईल फोन इतर कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीला देण्यात आला अथवा वाटप करण्यात आला तर सर्व फॅसिलिटीज रद्द होण्याचा समावेश असणाऱ्या, परंतु तेवढ्याच मर्यादेत नसणाऱ्या येस बँकेला करण्यात आलेल्या कोणत्याही विनंतीसाठी युझर संपूर्णत: उत्तरदायी व जबाबदारी असेल.

8. जर येस बँकेकडून वारंवार करण्यात येणारे कोणतेही बदल, दुरुस्त्या अथवा फेरफार यांच्या समावेशासह इथे नमूद केलेल्या अटी आणि शर्ती यांचा युझरने भंग केला तर येस बँकेला झालेल्या *(प्रत्यक्ष व आकस्मिक अशा सर्व)* सर्व नुकसान किंवा हानी किंवा दावा अथवा मागणी यासाठी युझर अपरिवर्तनीयरित्या आणि विनाशर्त उत्तरदायी असेल.

9. युझर हे मान्य करीत आहे आणि कबूल करीत आहे की येस बँकेकडून देण्यात येणारे ॲप्लिकेशन हे युझरच्या स्वत:च्या जोखीम व जबाबदारीवर असेल आणि या जोखमींमध्ये समाविष्ट असतील i) येस बँकेच्या नियंत्रणा बाहेर असणारी कोणतीही तांत्रिक चूक, बिघाड, ब्लिच, नेटवर्क बंद पाडणे, कायदेशीर मर्यादा आणि इतर कारणे ii) युझरकडून पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती चूक/बरोबर नसणारी/तंतोतंत नसणारी असल्याचे उघड होणे iii) प्रक्रियेमध्ये सहभागी असणारा कोणताही सेवा पुरवठादार/इतर तिसरी व्यक्ती/संस्था यांची कामगिरी iv) कोणतीही चूक, दोष, बिघाड किंवा सेवेमधील व्यत्यय अथवा निधी हस्तांतरणाला उशीर झाल्यामुळे निर्माण

झालेले परिणाम आणि v) ट्रान्समिशनच्या वितरणातील कोणताही विलंब किंवा ऑनलाईन/इलेक्ट्रॉनिक सूचनांचे वितरण न होणे किंवा त्याच्या ट्रान्समिशन अथवा वितरणामध्ये कोणताही दोष, त्रुटी किंवा चूक किंवा कोणत्याही प्रकारच्या कारणामुळे सूचनांच्या डिक्रिप्टींगमध्ये (उलगडण्यामध्ये) दोष, चूक किंवा त्रुटी असणे अथवा येस बँकेच्या नियंत्रणाबाहेरील कोणताही प्रसंग अथवा घटना.

**एफ. येस बँकेकडून वगळण्यात आलेल्या जबाबदाऱ्या:**

1. जर अन्यथा सुस्पष्टपणे नमूद केलेले नसेल, तर युझर यापुढे असे जाणतो, मान्य करतो आणि पुष्टी करतो की युझर आणि इतर मर्चंट ऑपरेटर्स/सेवा पुरवठादार यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही आर्थिक व्यवहाराबाबत येस बँक कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेणार नाही.

2. युझरची माहिती गोपनीय ठेवली जात आहे याची खात्री करुन घेण्यासाठी येस बँक सर्व प्रकारचे वाजवी प्रयत्न करील. तथापि येस बँक आणि/किंवा त्यांचे कर्मचारी किंवा एजंट किंवा प्रतिनिधी यांच्याकडून होणारी कोणतीही कृती, हलगर्जीपणा अथवा वर्तन यांच्यामुळे अशा प्रकारची माहिती कोणत्याही प्रकारे उघड झाली अथवा बाहेर फुटली तरी त्यासाठी येस बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.

3. ॲप्लिकेशनवर युझर म्हणून नोंदणी असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात ॲप्लिकेशनरबाबत युझरकडून आमंत्रित करण्यात आलेल्या कोणत्याही तिसरी व्यक्ती अथवा पक्ष यांच्यासाठी येस बँक जबाबदार अथवा उत्तरदायी असणार नाही.

4. युझर या गोष्टीची पुष्टी करीत आहे आणि मान्य करीत आहे की ॲप्लिकेशनद्वारे येस बँकेकडून देण्यात येणाऱ्या फॅसिलिटीजवर कोणतेही व्हायरस किंवा इतर कोणतेही इजा करणारे, विघातक किंवा करप्शन करणारे कोड आणि प्रोग्रॅम यांचा परिणाम होऊ शकतो आणि त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही प्रकारे येस बँक उत्तरदायी किंवा जबाबदार असणार नाही.

5. येस बँकेकडून करण्यात येणाऱ्या ॲप्लिकेशनच्या देखभालीपायी सूचनेनुसार प्रक्रिया करण्यास होणारा कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा सूचनांनुसार प्रक्रिया करण्यास येणारे अपयश यासाठी येस बँक उत्तरदायी असणार नाही.

6. युझरकडून देण्यात आलेल्या सूचनांचे कोणत्याही प्रकारच्या कोणत्याही कारणांमुळे पालन करण्यास येस बँकेला आलेले कोणतेही अपयश अथवा असमर्थतेमुळे निर्माण होणारी कोणतीही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष, तसेच कोणतीही हानी अथवा अन्य प्रकारच्या परिणामांसाठी येस बँक कोणत्याही आणि सर्व प्रकारे उत्तरदायित्व असण्याच्या दाव्यास नकार देत आहे.

7. युझरकडून ह्या ॲप्लिकेशनचा वापर झाल्यामुळे युझरच्या गोपनीयतेचा कोणत्याही प्रकारे भंग झाल्यास त्यासाठी येस बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.

8. युझर मान्य करीत आहे की येस बँक पुढील गोष्टींच्या बाबतीत कोणतीही जबाबदारी किंवा उत्तरदायित्व स्वीकारीत नाही: i) युझरच्या सूचनांवर विश्वासपूर्वक अवलंबून राहून येस बँकेकडून करण्यात आलेले कोणतेही आर्थिक व्यवहार ii) युझरकडून देण्यात आलेल्या सूचना ह्या खऱ्याखुऱ्या नाहीत किंवा अन्यथा अस्पष्ट, अयोग्य, संदिग्ध किंवा

शंकास्पद अथवा कायद्याच्या विरोधात आहेत असे स्वत:च्या संपूर्ण अधिकारात समजण्यासाठी येस बँककडे कारण असताना आर्थिक व्यवहार पार न पाडणे iii) सेवांमधील कोणतीही चूक, दोष, अपयश किंवा खंडित होणे यांच्यामुळे अथवा विलंब झालेल्या ट्रान्सफर/रेमिटन्सच्या परिणामी आणि येस बँकेच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कारणांमुळे युझरचे झालेले कोणत्याही प्रकारचे नुकसान अथवा त्याला सहन करावयास लागलेली हानी iv) फॅसिलिटीजचा वापर करताना तृतीय पक्षाकडून युझरच्या माहिती/सूचनांमध्ये झालेल्या अनधिकृत संपर्क v) फॅसिलिटीजचा वापर करताना युझरचे झालेले कोणतेही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा अनुषंगिक नुकसान.

9. युझर मान्य करीत आहे की गोपनीय स्वरुपाची सर्व माहिती उघड झाल्यामुळे युझरला झालेले कोणतेही नुकसान, हानी, निर्माण झालेले अथवा भोगावे लागलेले उत्तरदायित्व यांच्या संदर्भात येस बँक कोणत्याही प्रकारची जबाबदारी किंवा उत्तरदायित्व घेणार नाही.

10. युझरकडून देण्यात आलेल्या माहितीच्या अचूकतेची खात्री करुन घेण्यासाठी येस बँकेकडून आवश्यक कारवाई झाल्यानंतर देखील निर्माण झालेल्या अथवा निर्माण होऊ शकणाऱ्या कोणत्याही आनुषंगिक चुकीसाठी येस बँक जबाबदारी असणार नाही आणि येस बँकेकडून पुरविण्यात आलेल्या अचूक नसणाऱ्या माहितीचा परिणाम म्हणून युझरचे झालेले किंवा होऊ शकणारे कोणतेही नुकसान अथवा हानी यांच्याबाबत युझर येस बँकेकडे कोणत्याही प्रकारचा दावा करणार नाही.

11. युझरला कोणत्याही प्रकारे कशाही प्रकारची सदोष अथवा वाईट सेवा मिळाल्यास किंवा कोणतेही नुकसान झाल्यास त्यासाठी येस बँक उत्तरदायी असणार नाही.

**जी. सेवांच्या शर्ती:**

1. युझरने ॲप्लिकेशनद्वारे नेमकी विनंती केल्यानंतरच येस बँकेकडून फॅसिलिटीज पुरविण्यात येतील.

2. येस बँकेकडून पुरविण्यात आलेल्या किंवा पुरविण्यात येत असणाऱ्या ॲप्लिकेशनच्या नोंदणीची यशस्वी पूर्तता होण्यासाठी युझरला येस बँकेसाठी आवश्यक असणारी त्याची माहिती नोंदवावी लागेल.

3. येस बँकेकडून देण्यात आलेल्या किंवा देण्याचा प्रस्ताव असणाऱ्या ॲप्लिकेशनवर उपलब्ध असणाऱ्या प्रत्येक फिचर्स (वैशिष्ट्ये) किंवा फॅसिलिटीज यांच्यासाठी युझरला वेळचेवेळी आपली माहिती नोंदवावी लागेल.

4. वॅलेटचा लाभ घेणे आणि/किंवा ते कार्यरत करणे यासाठी एक पूर्व अट म्हणून युझरला युआयडीएआय (युनिक आयडेन्टिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडिया) यांनी दिलेला आधार नंबर किंवा येस बँकेच्या खातेधारकांना देण्यात आलेला कस्टमर आयडी सादर करावा लागेल आणि तो वनटाईम पासवर्ड द्वारे (ओटीपी) वैध करण्यात येईल. आधार नंबर किंवा कस्टमर आयडी यशस्वीरीत्या वैध केला गेल्यानंतर नाव, पत्ता इ. सारखी लोकसंख्या विषयक माहिती, जी आधार किंवा कस्टमर आयडीमध्ये नोंदविलेली असेल, ती वॅलेटच्या रजिस्ट्रेशनसाठी विचारात घेतली जाईल. आपला आधार क्रमांक किंवा (येस बँकेकडून देण्यात आलेला) येस बँक कस्टमर आयडी यांना वॅलेट सादर केल्याच्या तारखेपासून 1 (एक) वर्षाच्या आत, व्हॅलिडेट (वैध) न केलेल्या वर्तमान वॅलेट युझर्सच्या संदर्भात अशा प्रकारची वॅलेट्स अकार्यरत युझरला यापुढे अधिक कोणताही सूचना न देता किंवा येस बँकेसाठी कोणत्याही प्रकारची

जोखीम, जबाबदारी किंवा उत्तरदायित्व निर्माण न होता अशी वॅलेट्स अकार्यरत आणि रद्द करण्यासाठी येस बँकेकडे संपूर्ण अधिकार आणि शक्ती असेल.

5. युझर विनाशर्त मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की वॅलेटचा वापर पुढील अटींच्या अधीन असेल: ए) युझरची यशस्वीरीत्या नोंदणी झाल्यावर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) कडून वेळचेवेळी परवानगी दिल्यानुसार सर्व वॅलेट्सवर अनिवार्य मर्यादा लागू होतील. ह्या मर्यादा सर्व पार्टनर वॅलेट्ससाठी लागू असणाऱ्या क्युमिलेटिव्ह लिमिट्स असतील. बी) वॅलेटमधून युझरच्या बँकखात्यामध्ये निधी हस्तांतरित होण्यासाठी युझरला ॲप्लिकेशनमध्ये लाभधारक म्हणून बँकेच्या खात्यांची माहिती लिहावी लागेल. येस बँक एक कुलिंग पिरीयड/प्रतीक्षा कालावधी (तास, मिनिटांमध्ये असणारा) लागू करू शकेल आणि त्या वेळेनंतरच लाभधारकाच्या खात्यामध्ये हस्तांतरण होऊ शकेल. याशिवाय विशिष्ट युझरकडून वाढविता येऊ शकणाऱ्या लाभधारकाच्या रकमेवर येस बँक मर्यादा सुद्धा लागू करू शकेल. सी) वॅलेट कार्यान्वयन केल्याच्या आणि/किंवा वॅलेटचा लाभ झाल्याच्या तारखेपासून 1 (एक) वर्ष पूर्ण झाल्याच्या तारखेपर्यंत आरबीआयकडून आवश्यक असल्यानुसार संपूर्ण केवायसी (नो यूवर कस्टमर) प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. येस बँकेकडे केवायसी प्रक्रियेची पूर्तता केली नाही किंवा ती पूर्ण झाली नाही, तर युझरला कोणतीही अधिक सूचना न देता किंवा येस बँकेवर कोणतीही जोखीम, जबाबदारी अथवा उत्तरदायित्व निर्माण न होऊ देता अशी वॅलेट्स अकार्यरत आणि रद्द करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार येस बँकेला असेल. येस बँकेचे समाधान होईल अशाप्रकारे केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच, वॅलेटमधून सर्व क्रेडिट्स, डेबिट्स किंवा ट्रान्सफर्स करण्यास परवानगी असेल. याबाबतीत येस बँकेचा निर्णय हा अंतिम आणि युझरवर बंधनकारक असेल.

6. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की वेळचे वेळी वेबसाईट www.yesbank.in वर अद्ययावत करण्यात आलेल्या आणि उपलब्ध असणाऱ्या व्हर्च्युअल कार्डच्या अटी आणि शर्ती यांच्या अनुसार व्हर्च्युअल कार्डचा कारभार चालविण्यात येईल आणि व्हर्च्युअल कार्डवरील शिल्लक ही वॅलेटमधील शिलकीच्या एवढी असेल.

7. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की ॲप्लिकेशन मार्फत क्रेडिट कार्ड फॅसिलिटीचा लाभ घ्यावयाचा असल्यास युझरला पुढील अटींची पूर्तता करावी लागेल: (ए) युझरकडे वैध येस बँक क्रेडिट कार्ड असले पाहिजे. (बी) युझरने ॲप्लिकेशनवर सदर क्रेडिट कार्डची माहिती नोंदविलेली असली पाहिजे.

8. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की ॲप्लिकेशन मार्फत ट्रॅव्हल कार्ड फॅसिलिटीचा लाभ घ्यावयाचा असल्यास युझरला पुढील अटींची पूर्तता करावी लागेल. (ए) युझरकडे वैध येस बँक ट्रॅव्हल कार्ड असले पाहिजे. (बी) युझरने ॲप्लिकेशनवर सदर वैध ट्रॅव्हल कार्डचा तपशील नोंदविलेला असला पाहिजे.

9. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की फॅसिलिटीजचा लाभ घेण्यासाठी: (ए) फ्रेन्डलिस्ट, मोबाईल नंबर आणि इमेल आयडीज गोळा करण्यासाठी ॲप्लिकेशन युझरच्या सोशल प्रोफाइलमध्ये संपर्क साधेल आणि युझरच्या निश्चित विनंतीनुसार ॲप्लिकेशनमध्ये सहभागी होण्यासाठी या तृतीय पक्षीय युझर्सकडे विनंती पाठविण्यात येतील. (बी) ॲप्लिकेशन हे युझरचा सोशल प्रोफाइल, मोबाइल नंबर आणि इ-मेल आयडी यांच्यावर नोटिफिकेशन (अधिसूचना) पाठविल (सी) युझर या ॲप्लिकेशनमध्ये त्याच्या बँक खात्याचा तपशील टाकू शकेल. (डी) युझरच्या येस बँकेतील अथवा इतर बँकेतील खात्याचे तपशील संपूर्णत: येस बँकेच्या अधिकारात निश्चित केल्यानुसार विशिष्ट काळासाठी आणि कालावधीसाठी येस बँकेच्या सर्व्हरच्या डाटा बेसमध्ये साठवून ठेवण्यात येतील. (इ) येस

बँकेकडून देण्यात आलेल्या फॅसिलिटीजच्या अंतर्गत कोणतेही निधी हस्तांतरण करताना युझर येस बँकेने आखून दिलेल्या मर्यादांचे पालन करील.

10. युझर या गोष्टीची पुष्टी करीत आहे की येस बँकेकडून युझरला दिलेल्या सूचनांचे पालन हे युझरने फॅसिलिटीज्चा लाभ घेण्यासाठी दिलेल्या ओटीपी/पासकोड/पासवर्ड यांची वैधता पडताळणी केल्यानंतरच करण्यात येईल.

11. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की एकदा आर्थिक व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, युझरने दिलेल्या कोणत्याही स्टॉप पेमेन्टच्या सूचना येस बँकेकडून स्विकारल्या जाणार नाहीत आणि/किंवा त्यांच्यावर कारवाई केली जाणार नाही.

12. युझर मान्य करीत आहे आणि पुष्टी देत आहे की विशिष्ट व्हीपीएचे वाटप हे विशिष्ट व्हीपीएची उपलब्धता असण्याच्या अधीन आणि संपूर्णत: येस बँकेच्या अधिकारात असेल. युझर मान्य करीत आहे की, येस बँक व्हीपीएच्या डुप्लिकेशनसाठी अथवा अनेक युझर्ससाठी एकाच व्हीपीएचे वाटप होण्यास परवानगी देणार नाही.

13. युझरने फॅसिलिटीचा वापर करतांना खात्री करून घ्यावी की, i) युझरला फॅसिलिटिजचा वापर करण्याचा अधिकार आहे; ii) युझरने अशा प्रकारच्या फॅसिलिटीच्या संबंधात भारतात लागू असणारे प्रचलित कायदे आणि नियमावली यांची पूर्तता केलेली आहे. iii) युझरला फॅसिलिटीज पुरविण्यासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची माहिती आणि/किंवा सहाय्य युझरने येस बँकेला दिलेले आहे. iv) युझर त्याच्या येस बँक किंवा इतर कोणत्याही बँकेकडे असणाऱ्या खात्यांसाठी वेळचेवेळी देण्यात आलेले पासवर्ड्स, खातेक्रमांक यांचा समावेश असणारी खात्यांविषयीची माहिती कोणत्याही व्यक्तिला देणार नाही.

14. युझर ही गोष्ट मान्य करीत आहे आणि कबूल करीत आहे की येस बँक हे फॅसिलिटीजचे केवळ पुरवठादार आहेत आणि येस बँक फॅसिलिटीजसाठी कोणतीही हमी किंवा दावा यांची जबाबदारी घेत नाहीत तसेच येस बँक हे कोणत्याही तृतीय पक्षीय व्यापाऱ्याच्या फॅसिलिटीज किंवा मानांकन किंवा पद यांच्याबाबत कोणत्याही प्रकारचा दुजोरा देत नाहीत.

15. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की येस बँकेकडून देण्यात येणाऱ्या फॅसिलिटीजसाठी असणारी कोणतीही किंवा सर्व प्रकारची शुल्के ही संपूर्णत: येस बँकेच्या अधिकारात असतील. युझरला कोणत्याही प्रकारची सूचना अथवा माहिती न देता ती काढून टाकण्याचे किंवा सुधारण्याचे किंवा प्रसंगोपात त्यांच्यामध्ये फरक करण्याचे येस बँकेला स्वातंत्र्य असेल.

16. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की कोणत्याही प्रकारच्या कारणामुळे फॅसिलिटीचा वापर किंवा फॅसिलिटीज्च्या वापराच्या संदर्भात बँकेचे खाते बंद करण्यात आले किंवा गोठविण्यात आले तर युझर ही समस्या थेट त्याच्या बँकेमध्ये जाऊन निवारण करुन घेईल आणि त्यासाठी येस बँकेला उत्तरदायी किंवा जबाबदार समजणार नाही. येस बँकेकडून युझरला परत करण्यात आलेल्या पैशांमध्ये व्याजाचा समावेश नसेल किंवा त्यावर कोणतेही व्याज लागू होणार नाही, कारण हे ॲप्लिकेशन ही येस बँकेकडून युझरला पुरविण्यात आलेली व्याजविरहीत फॅसिलीटी (सुविधा) आहे.

17. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की i) येस पे वॅलेटमधील शिल्लक रक्कम किंवा युझरकडून वापरण्यात येणारे व पालन करण्यात येणारे ॲप्लिकेशन यांच्या मधील शिल्लक रक्कम यांच्यावर येस बँकेकडून कोणत्याही

प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही. ii) ॲप्लिकेशनच्या बाबतीत युझरकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही रेफरल्ससाठी (शिफारशींसाठी) येस बँकेकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक अथवा अन्य प्रकारचे इन्सेन्टिव्ह/बक्षिस देण्यात येणार नाही आणि अशा प्रकारच्या कोणत्याही शिफारशींबाबत आलेल्या कोणत्याही तक्रारींसाठी येस बँक जबाबदार असणार नाही. iii) युझरने ठरविलेल्या उद्दिष्टांच्या (गोल) बाबतीत वजावट झालेल्या रकमेवर येस बँकेकडून कोणतेही व्याज दिले जाणार नाही. iv) आर्थिक व्यवहार करण्यासाठी पुरेशी रक्कम शिल्लक असेल तर वेळापत्रकानुसार ठरविण्यात आलेले सर्व आर्थिक व्यवहार देय तारखेस भारतीय प्रमाणवेळ सकाळी 12 वाजता पार पाडण्यात येईल.

18. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की जर युझरने येस बँकेकडून कळविण्यात आलेल्या मार्गांऐवजी अन्य मार्गांने ॲप्लिकेशनमध्ये पैशांचा भरणा करण्याचा प्रयत्न केला तर सदर रक्कम किंवा पैसे ॲप्लिकेशनमध्ये भरले जाणार नाहीत आणि येस बँकेकडे सदर रक्कम किंवा पैसे मिळाल्याच्या तारखेपासून कामकाजाच्या 21 दिवसांच्या आत येस बँक सदर रक्कम किंवा पैसे परत करील.

19. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की जर नियामक अधिकारी किंवा सरकार यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या नकारात्मक अथवा काळ्या यादीमध्ये युझरचे नाव आढळले तर त्या युझरकडून वापरण्यात आलेले किंवा त्याला मंजूर करण्यात आलेले ॲप्लिकेशन तात्पुरते थांबविणे किंवा रद्द करणे एवढ्याच मर्यादेत नसणारी परंतु तिचा समावेश असणारी, अशी कोणतीही सुयोग्य वाटणारी कारवाई येस बँकेकडून करण्यात येईल.

20. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की जर युझरने सलग एक (01) वर्षे कालावधीमध्ये वॅलेटचा वापर करुन कोणताही आर्थिक व्यवहार पूर्ण केला नाही तर, युझरच्या वॅलेटमधील सर्व क्रेडिटच्या व्यवहारांवर (वॅलेटमध्ये पैसे जमा करण्यावर) येस बँकेच्या संपूर्ण अधिकारात प्रतिबंध करण्यात येईल. बँकेकडून वेळचे वेळी निश्चित करण्यात आलेल्या योग्य त्या कस्टमर प्रक्रियेनंतर आणि वैधता पूर्ण झाल्यानंतरच सदर वॅलेट पुन्हा एकदा कार्यरत करण्यात येईल. असा युझर येस बँकेकडून पुरविण्यात आलेल्या ॲप्लिकेशनमार्फत करण्यात आलेल्या एकूण एक सर्व आर्थिक व्यवहारांसाठी स्वत: जबाबदार असेल. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की येस बँक कोणत्याही वेळेस किंवा येथे नमूद केलेल्या अटी आणि शर्ती यांचा युझरकडून भंग झाल्यास कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय अथवा जर येस बँकेला युझरचा मृत्यु झाल्याचे, दिवाळे निघाल्याचे समजले, किंवा युझरचे कायदेशीर अस्तित्व संपले किंवा इतर कोणतेही कारण निर्माण झाले तर येस बँक सदर फॅसिलिटीज काढून घेऊ शकेल किंवा रद्द करु शकेल.

21. युझर ही गोष्ट मान्य व कबूल करीत आहे की येस बँक प्रत्यक्षरीत्या किंवा त्यांचे सहयोगी, प्रतिनिधी, एजंट्स किंवा कंत्राटाअंतर्गत सेवा पुरवठादार यांच्या मार्फत तिच्या वतीने ह्या ॲप्लिकेशनमार्फत फॅसिलिटीज पुरवू शकेल.

22. युझर ही गोष्ट कबूल, मान्य व स्वीकार करीत आहे की फॅसिलिटीजच्या संदर्भात युझरकडून येस बँकेला पुरविलेल्या माहितीमध्ये फेरफार अथवा सातत्याचा अभाव असल्याचे लक्षात आले अथवा उघड झाले तर अशा माहितीचे पूर्णत्व, उत्तरदायित्व व जबाबदारी युझरवर राहील. युझर हा फॅसिलिटीजच्या संदर्भात येस बँकेला नेहमीच अचूक आणि बरोबर माहिती पुरविण्याचे कबूल करीत आहे, मान्य करीत आहे व त्यास पुष्टी देत आहे. येस बँकेला देण्यात आलेल्या माहितीमध्ये कोणतीही चूक किंवा त्रुटी आहे अशी युझरला शंका आली तर, युझर येस बँकेला ताबडतोब तसे कळविल अथवा सूचित करील. ही माहिती किंवा सूचना मिळाल्यानंतर शक्य असेल तेथे सर्वोत्तम प्रयत्नाद्वारे सदर चूक ताबडतोब दुरुस्त करण्यासाठी येस बँक प्रयत्न करील.

**एच. रद्द करणे:**

1. जर युझरने येथे नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्ती यांचा भंग केला किंवा येस बँकेला युझरचा मृत्यू, दिवाळखोरी अथवा कायदेशीर क्षमतेचा (अस्तित्वाचा) अभाव यांची माहिती मिळाली तर येस बँक युझरला कोणतीही पूर्वसूचना न देता, कोणत्याही वेळेस आपल्या संपूर्ण अधिकारात या फॅसिलिटीज संपूर्णत: किंवा अंशत: तात्पुरत्या काढून घेईल किंवा रद्द करील.

2. युझर कबूल करीत आहे आणि मान्य करीत आहे की युझरचे ॲप्लिकेशन बंद झाल्यावर त्यावरील फॅसिलिटीज आपोआपच रद्द होतील. युझर स्वत:च्या इच्छेने आपले वॅलेट बंद करण्याचा निर्णय घेऊ शकतो. वॅलेट स्वेच्छापूर्वक बंद झाल्यास वॅलेटमधील शिल्लक रक्कम फक्त (येस बँकेकडून आयोजित केलेल्या पडताळणीच्या आधारे) युझरच्या पडताळणी केलेल्या बँक खात्यामध्येच हस्तांतरीत करण्यात येईल. युझर येस बँकेकडे किंवा भारतामध्ये प्रस्थापित व कार्यरत असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही बँकेमध्ये असणाऱ्या खात्याची माहिती बँकेला पडताळणी करता यावी यासाठी बँक खात्याचे तपशील (खाते क्रमांक व आयएसएफसी कोड) कळविण्याचे विनाशर्त मान्य करीत आहे..

3. युझर कबूल करीत आहे व मान्य करीत आहे की युझरकडून क्लोझरची रिक्वेस्ट मिळाल्यानंतर युझरच्या बँक खात्यामध्ये प्रत्यक्ष रक्कम हस्तांतरीत केली जाण्यापूर्वी येस बँकेला *(अशी विनंती मिळाल्यावर युझरला कळविण्यात आलेली बँकेच्या संपूर्ण अधिकारात निश्चित करण्यात आलेली)* विशिष्ट रक्कम डेबिट करण्याचा येस बँकेला अधिकार असेल. युझरच्या बँक खात्यामध्ये प्रत्यक्ष रक्कम पाठविली जाणे आणि/किंवा हस्तांतरीत होणे यापूर्वी येस बँकेने नमूद केलेल्या पडताळणीच्या प्रक्रियेचे पालन करण्याचे युझर विनाशर्त आणि अपरिवर्तनीयरित्या मान्य करीत आहे.

4. लागू होणारे कायदे किंवा नियम यांनी अन्य काही तरतूद केल्याचे वगळता, येस बँक सुरक्षेच्या कारणास्तव, कोणत्याही वेळेस, युझरला कोणतीही पूर्वसूचना न देता फॅसिलिटीज रद्द करण्याचे आणि/किंवा विस्तारित करण्याचे, या फॅसिलिटीजचा वापर करुन परवानगी दिलेले आर्थिक व्यवहार घटविण्याचे किंवा तात्पुरते स्थगित करण्याचे अथवा या फॅसिलिटीजशी संबंधित प्रक्रिया व आर्थिक व्यवहारांच्या मर्यादा बदलण्याचे संपूर्ण अधिकार राखून ठेवित आहे.

5. येस बँक आपल्या संपूर्ण अधिकारामध्ये युझरला कोणतीही पूर्वसूचना व कोणतेही कारण न देता, कोणत्याही वेळेस संपूर्णरित्या किंवा अंशत:, या फॅसिलिटीज तात्पुरत्या स्वरुपात काढून घेऊ शकेल.

6. येस बँक फॅसिलिटीज तात्पुरत्या स्थगित होण्याची किंवा रद्द करण्याची गरज असणाऱ्या सुरक्षेच्या कारणास्तव किंवा कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगी किंवा देखभालीचे काम किंवा दुरुस्ती करण्याची गरज असण्याच्या काळामध्ये कोणत्याही वेळेस, कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय, फॅसिलिटीज तात्पुरत्या स्थगित करु शकेल.

**आय. इन्डेम्निटी:**

1. येस बँकेने युझरला फॅसिलिटीज पुरविण्याचे मान्य केल्याची बाब लक्षात घेता, युझर स्वत:च्या खर्चाने, अपरिवर्तनीयरीत्या आणि विनाशर्त येस बँक आणि त्यांचे संचालक, अधिकारी, मालक, एजंट्स, को–ब्रॅण्डर्स किंवा इतर सहयोगी, कर्मचारी, माहिती पुरवठादार, परवानाधारक, परवाना देणारे, (लायसेन्सर्स, लायसेन्सिज) सल्लागार

कंत्राटदार आणि इतर लागू असणारे तृतीय पक्षीय (एकत्रितरित्या 'इन्डेम्निफाईड पार्टीज्') यांना इन्डेम्निफाय करण्याचे, त्यांचा बचाव करण्याचे, त्यांना निर्दोष समजण्याचे तसेच त्यांना कोणतेही आणि सर्व प्रकारचे नुकसान, हानी, दावे, डिमांड्स, कृतीमागील कारणे, कर्ज किंवा उत्तरदायित्वाच्या संदर्भात वकिलांची वाजवी फी व पुढील गोष्टींपासून निर्माण होणारे, त्यांच्याशी संबंधित, त्यातून निर्माण होणाऱ्या इन्डेम्निफाइड पार्टीज्ना भोगावे लागलेले अथवा लागू शकणारे इतर खर्च, करावे लागणारे खर्च या सर्वापासून या पक्षांना 'इन्डेम्निफाय डिफेन्ड' आणि 'हार्मलेस' समजण्याचे मान्य करीत आहे. i) येथे नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही अटी आणि शर्ती किंवा येस बँकेकडून वेळचेवेळी निर्देशित करण्यात येणारी धोरणे तसेच इतर कोणत्याही अतिरिक्त अटी आणि शर्ती यापैकी कोणत्याही गोष्टीचा युझरकडून भंग होणे किंवा पूर्तता न होणे. ii) फॅसिलिटीजच्या वापराच्या संदर्भात किंवा युझरच्या कोणत्याही कृती अथवा हलगर्जीपणापायी निर्माण झालेला, कोणत्याही बाबीमुळे इन्डेम्निफाइड पार्टीजच्या विरुद्ध निर्माण झालेला कोणताही दावा, डिमांड, मतभेद अथवा कायदेशीर कारवाई iii) युझरकडून कोणताही कायदा अथवा तिसऱ्या पक्षाचे अधिकार यांच्याकडे झालेले दुर्लक्ष किंवा त्यांचे उल्लंघन अथवा कथित उल्लंघन.

2. युझर कबूल करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की येस बँकेकडून फॅसिलिटीज अंशतः अथवा संपूर्णतः काढून घेण्यात आलेल्या असल्या तरीदेखील, ही इन्डेम्निटी वैध, अस्तित्वात राहणारी आणि युझरवर बंधनकारक असेल.

3. युझर कबूल करीत आहे आणि पुष्टी करीत आहे की फॅसिलिटीज रद्द करण्यात आलेल्या किंवा मुदतपुर्ती झालेल्या असल्या तरीदेखील ही इन्डेम्निटी ही सतत चालू राहणारी असून ती वैध व अस्तित्वात राहणारी तसेच युझरवर बंधनकारक राहील.

4. युझर इन्डेम्निफाइड पार्टीजना (नुकसानभरपाई देय असणाऱ्या पक्षांना) कोणत्याही प्रकारचे नुकसान, खर्च आणि दावे अथवा निर्माण झालेले नसले तरी अथवा आकस्मिक स्वरुपाचे असलेले खर्च यांच्याबाबत नुकसानभरपाई देण्यासाठी पुरेशी आहे अशी नुकसानभरपाई मिळणाऱ्या पक्षांनी निश्चित केलेली असेल एवढी रक्कम देण्याचे मान्य व कबूल करीत आहे.

**जे. गोपनीयता:**

1. लागू असणाऱ्या कायद्यांचा प्रतिबंध नसण्याच्या मर्यादेपर्यंत येस बँकेला युझरशी संबंधित कोणतीही गोपनीय माहिती किंवा फॅसिलिटीजचा लाभ घेण्यासाठी अथवा त्यांचा वापर करण्यासाठी युझरकडून देण्यात आलेली कोणतीही इतर माहिती, त्यांच्या शाखा, प्रतिनिधींची कार्यालये, संलग्न संस्था, प्रतिनिधी, लेखापरीक्षक आणि येस बँकेने निवडलेले तृतीय पक्षीय यांना परस्परांमध्ये, ते कोणत्याही ठिकाणी असले तरी हस्तांतरित करण्याचा अधिकार असेल.

2. येस बँकेला योग्य वाटेल त्यानुसार, इतर कोणतीही बँक किंवा असोसिएशन किंवा वित्तिय संस्था यांना येस बँकेच्या ताब्यात असणारी आणि ज्ञात असणारी युझरशी संबंधित कोणतीही किंवा सर्व माहिती, कोणत्याही वेळेस उघड करण्याचा अधिकार असेल.

3. हे कलम येस बँकेकडून युझरला दिलेल्या फॅसिलिटीज रद्द झाल्या किंवा त्यांची मुदतपूर्ती झाली तरी अस्तित्वात असेल.

**के. दावा फेटाळणे :**

1. येस बँक ही कोणतेही अथवा सर्व प्रकारचे उत्तरदायित्व असण्यापासून मुक्त असेल, जर असे असेल i) आवश्यक त्या भौगोलिक कक्षेत नसणे किंवा नैसर्गिक आपत्तींचा समावेश असणारे कोणतेही दुसरे कारण असणे किंवा कोणतीही कायदेशीर बंधने किंवा टेलिकम्युनिकेशन नेटवर्कमधील तांत्रिक बिघाड किंवा येस बँकेच्या प्रत्यक्ष नियंत्रणापलिकडील इतर कोणतेही कारण यांचा समावेश असणाऱ्या, परंतु तेवढ्याच मर्यादेत नसणाऱ्या कोणत्याही *बाह्य शक्तिंमुळे (फोर्स माजुरे)* युझरला फॅसिलिटीजचा लाभ घेता न येणे. ii) वर नमूद केलेल्या कारणांमुळे फॅसिलिटीजमध्ये झालेल्या कोणत्याही प्रकारच्या चुकीमुळे युझर अथवा इतर कोणतीही व्यक्ति यांना निर्माण झालेल्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हानीमुळे निर्माण होणारे कोणत्याही प्रकारचे उत्तरदायित्व. iii) प्रक्रिया किंवा प्रेषण करीत असताना अथवा इतर कोणत्याही व्यक्तिने अनाधिकृतरीत्या संपर्क साधल्यामुळे कोणतीही गोपनीय माहिती गहाळ होणे किंवा गोपनीयतेचा भंग होणे. iv) सेवा पुरवठादार किंवा कोणताही तृतीयपक्ष यांची कोणतीही चूक अथवा दोष यांच्यामुळे फॅसिलिटीजवर होणारे परिणाम.

2. येस बँक फॅसिलिटीच्या संदर्भात अथवा त्याचे फलस्वरुप म्हणून कोणत्याही सेवा पुरवठादाराने किंवा कोणत्याही तृतीय पक्षाने दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेबाबत येस बँक सुस्पष्ट किंवा सूचित अशा कोणत्याही स्वरुपाची कोणतीही हमी देत नाही.

3. ॲप्लिकेशनमार्फत युझरकडून नवीन क्रेडिट कार्ड किंवा ट्रॅव्हलकार्डसाठी केलेल्या सर्व मागण्या ह्या येस बँकेच्या संपूर्णत: अधिकारात असतील. युझर कबूल करीत आहे आणि पुष्टी देत आहे की नवीन क्रेडिट कार्ड किंवा ट्रॅव्हल कार्डसाठी मागणी नोंदविणे याचा अर्थ येस बँकेकडून त्या स्वीकारल्या जाणे असा होत नाही. युझर कडून केलेल्या कोणत्याही मागणीचा स्वीकार हा येस बँकेकडून क्रेडिट कार्ड किंवा ट्रॅव्हल कार्ड सादर करण्यासाठी निर्देशित केलेल्या असणाऱ्या अटी आणि शर्ती पूर्ण होण्याच्या अधीन असेल.

4. फॅसिलिटीजच्या संदर्भात ॲप्लिकेशनमार्फत प्रेषण करण्यात आलेल्या व्यक्तिगत किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या मेसेज किंवा सूचनेची गोपनीयता किंवा सुरक्षितता यांची हमी येस बँक देत नाही.

5. येस बँक फॅसिलिटीजद्वारे युझर किंवा कोणतीही व्यक्ती यांना सहन कराव्या लागलेल्या अथवा प्राप्त झालेल्या कोणत्याही स्वरुपाच्या आणि केव्हाही झालेल्या हानी अथवा नुकसान किंवा त्यांचे कार्य अथवा कामगिरी यांची पद्धत व नेटवर्क यांच्या बाबतीत येस बँक कोणत्याही प्रकारची हमी देत नाही किंवा त्याबाबत बाजू मांडत नाही.

6. येस बँक आणि/किंवा त्यांचे संचालक आणि कर्मचारी, एजंट किंवा कंत्राटदार हे युझर किंवा कोणतीही व्यक्ती यांना येस बँकेच्या मागणी स्वीकारण्यासाठी, त्यावर प्रक्रिया करण्यासाठी आणि कोणतीही उत्तरे तयार करण्यासाठी आणि परत पाठविण्यासाठी झालेला कोणताही विलंब, त्यातील अडथळा, सस्पेन्शन, रिझोल्यूशन किंवा चूक यामुळे किंवा युझर आणि कोणतेही सेवा पुरवठादार यांचे नेटवर्क आणि येस बँकेची प्रणाली आणि युझर टेलिकम्युनिकेशनचे उपकरण यांच्यामुळे कोणतीही माहिती किंवा मेसेज यांचे प्रेषण करण्यात आलेले कोणतेही अपयश, झालेला विलंब, निर्माण झालेला अडथळा किंवा तात्पुरता विरोध किंवा मर्यादा किंवा चूक तसेच युझर, येस बँकेची सिस्टीम किंवा फॅसिलिटीज देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा पुरविणारा कोणताही तिसरा पक्ष यांच्या टेलिकम्युनिकेशन इक्विपमेन्टचा बिघाड किंवा त्यातील अडथळा किंवा त्यांचे लांबणीवर पडलेले काम किंवा काम बंद पडणे याद्वारे युझर किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांना अंदाज येऊ शकणारा किंवा न येऊ शकणारा भोगावा लागणारा,

सॉफ्टवेअरसह कोणत्याही उपकरणाचे मूल्य किंवा वापर यांचे नुकसान तसेच उत्पन्न, नफा, व्यवसाय, कंत्राट, अपेक्षित बचत अथवा शुभेच्छा यांच्यापुरत्या मर्यादित नसणाऱ्या परंतु त्यांचा समावेश असणाऱ्या अशा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा परिणाम स्वरुपी असे कोणत्याही स्वरुपातील कोणतेही नुकसान अथवा हानी यांच्यासाठी उत्तरदायी असणार नाहीत.

7. नमूद केलेल्या अटी आणि शर्ती याच्या विरुद्ध अर्थाने येथे काहीही सांगितले असले तरी, युझर आणि एखादा लहानसा सेवा पुरवठादार किंवा कोणताही तिसरा पक्ष असणारा सेवा पुरवठादार (मग तो त्यांच्यावतीने अथवा अन्य पद्धतीने येस बँकेकडून नियुक्त करण्यात आलेला असला तरी) यांच्यामध्ये होणाऱ्या कोणत्याही वादविवादाबाबत येस बँक कोणत्याही प्रकारे सहभागी अथवा कोणत्याही प्रकारे युझरसाठी उत्तरदायी असणार नाही.

8. युझरच्या सूचना अमलात आणण्यासाठी फॅसिलिटी मार्फत पाठविण्यात येणाऱ्या व्यक्तिगत किंवा खात्याची माहिती यांची गोपनीयता, गुप्तता आणि सुरक्षितता यासाठी येस बँकेला जबाबदार धरता येणार नाही.

9. आकडेवारीचे विश्लेषण किंवा क्रेडिट रेटिंग यासाठी कायदेशीर आदेशांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने कोणत्याही टेलिकम्युनिकेशन किंवा इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग नेटवर्कमध्ये सहभागी होण्याचा समावेश असणाऱ्या, परंतु तेवढीच मर्यादा नसणाऱ्या कारणांसाठी येस बँकेकडून तिसऱ्या पक्षाकडे व्यक्तिगत माहिती उघड केल्यामुळे युझरला सहन कराव्या लागलेल्या कोणत्याही हानीसाठी येस बँकेला उत्तरदायी समजले जाणार नाही.

**एल. सब–कॉन्ट्रॅक्टिंग:**

1. येस बँक हे फॅसिलिटीज् अंतर्गत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी युझरच्या संमतीशिवाय किंवा त्यांना कोणतीही सूचना न देता कोणताही तिसरा पक्ष किंवा स्वतंत्र कंत्राटदार यांना सबकॉन्ट्रॅक्ट देऊ शकते.

2. या अटी आणि शर्ती यांच्यामधील कोणतीही बाब ही येस बँक आणि सबकॉन्ट्रॅक्टर किंवा स्वतंत्र सेवापुरवठादार यांच्या दरम्यान कोणतेही करारात्मक संबंध निर्माण करणारी असल्याचे समजण्यात येऊ नये, तसेच येस बँकेवर सब–कॉन्ट्रॅक्टर किंवा स्वतंत्र सेवापुरवठादार यांच्याकडून देय असणारे कोणतेही पैसे देण्याबाबत येस बँकेवर कोणतीही जबाबदारी असणार नाही.

**एम्. सेव्हरॅबिलिटी/वेगळे करता येणे:**

1. जरी ह्या दस्ताऐवजामधील कोणतीही अट किंवा तरतूद ही सक्षम न्यायाधिकरण असणाऱ्या न्यायालयाकडून अवैध असल्याचे जाहीर करण्यात आले, तरी ह्या पर्चेस ऑर्डरच्या उर्वरित अटी आणि तरतुदी ह्या अखंड आणि संपूर्ण प्रभाव आणि परिणाम घडविणाऱ्या राहतील.

**एन. तृतीय पक्ष लाभकारक :**

1. येथे खास नमूद केल्याचा अथवा उल्लेख केल्याचा अपवाद करता, येथे नमूद केलेली किंवा व्यक्त झालेली कोणतीही बाब ही युझरव्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ति किंवा कायदेशीर संस्था यांना कोणतेही अधिकार देण्याचा हेतू असणारी नाही किंवा तशा अर्थाची असल्याचे समजण्यात येऊ नये.

**ओ. शुल्क आणि ग्राहक सहाय्य :**

1. जेव्हा युझर येस पे वॅलेटमधून इतर कोणत्याही बँक खात्यामध्ये कोणत्याही रकमेचे हस्तांतरण करतो तेव्हा येस बँक त्यासाठी त्या युझरवर शुल्क आकारणी करेल. हे शुल्क हस्तांतरीत केलेल्या रकमेच्या 2.5% असेल. येस बँक युझरवर आकारण्यात आलेल्या शुल्कामध्ये दुरुस्ती आणि फेरफार करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

2. येस पे वॅलेटविषयी अधिक माहितीसाठी युजर्स www.yesbank.in किंवा yespay.co.in वर व्हिजिट करु शकतात.

3. कोणत्याही शंका/तक्रारी असल्यास युझर्स येस बँकेचा विनामूल्य क्र. 1800 2000 वर संपर्क साधू शकतात किंवा yestouch@yesbank.in वर इमेल पाठवू शकतात.

4. जर देण्यात आलेले रिझोल्यूशन तुमच्या अपेक्षांची पूर्तता करीत नसेल तर युझर head.grievanceredressal@yesbank.in वर तक्रार निवारण अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात. जर तक्रार निवारण अधिकाऱ्याने दिलेले रिझोल्यूशन/उपाययोजना समाधानकारक नसेल तर युझर principal.nodalofficer@yesbank.in वर प्रिन्सिपल नोडल ऑफिसबरोबर संपर्क साधू शकतात

5. युझरला याद्वारे कळविण्यात येत आहे की येस बँक ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बँकिंग ओम्बुडसमॅन स्किम, 2006 खाली संरक्षित आहे. या स्किम अंतर्गत बँकेविरुद्ध केलेल्या कोणत्याही तक्रारींचे 30 दिवसांच्या आत निराकरण करण्यात आले नाही तर ती (तक्रार) संबंधित शहराच्या बँकिंग ओम्बुडस्मॅनकडे पाठविली जाऊ शकते. संपर्काच्या माहितीसाठी कृपया खाली दिलेली लिंक फॉलो करा: https://www.rbi.org.in/Scripts/bs_viewcontent.aspx?Id=164

**पी. अनुशासन करणारा कायदा आणि न्यायाधिकरण:**

1. येथे नमूद केलेल्या आणि येस बँकेकडून दुरुस्त किंवा फेरफार करण्यात आलेल्या सर्व अटी आणि शर्ती यांची रचना आणि सर्व मतभेद यांच्यावर भारतातील कायद्यांच्या अंतर्गत अनुशासन करण्यात येईल.

2. येथे नमूद केलेल्या आणि येस बँकेकडून वेळचेवेळी दुरुस्त किंवा फेरफार करण्यात आलेल्या सर्व अटी आणि शर्ती यांच्या संबंधात, त्यांचा भंग, समाप्ती किंवा वैधता यामुळे निर्माण होणारे मतभेद, विवाद किंवा दावे हे संपूर्णत: मुंबई येथील न्यायालयाच्या न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात येथील.

**युझरने वरील अटी आणि शर्ती वाचल्या असून त्यांचा अर्थ समजून घेतला आहे आणि त्याची स्वतंत्र इच्छा, माहितीपूर्ण संमती आणि स्वतंत्र इच्छाशक्ती याद्वारे ह्या ॲप्लिकेशनमार्फत फॅसिलिटीजचा लाभ घेण्याचे मान्य केले आहे.**